**प्रेस नोट** **दि.०३/०८/२०१९**

## हडपसर पोलीस स्टेशन,पुणे

## दाखल गुन्हयांतील आरोपीस अटक

दिनांक १६/३/२०१७ रोजी ११.०० वा. चे सुमारास एका मुलीस एका अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले होते. त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि. नं. ३०५/२०१७ भा.द.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

गुन्हयाचे तपासाअंती सदरची पिडीत मुलगी हि मिळुन आली होती. तिच्याकडे विचारपुस केली असता आरोपी सचिन राहुल पोतदार, रा. शुक्रवार पेठ, पुणे याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे निर्दशनास आले होते. त्याअनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३०५/२०१७ भा.द.वि. कलम ३६३ यामध्ये ३७०(अ),३७६ व अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ४,५ व पोस्को कलम ४,६,७,८,१० अशी कलम वाढ करण्यात आली होती. दाखल गुन्हयातील मुलीला फुस लावुन पळवुन नेवुन लैंगिक अत्याचार करणारा फरार आरोपी सचिन राहुल पोतदार हा वेषांतर करुन एका ठिकाणी न राहता वेगवेगळी ठिकाणे बदलुन वावरत होता. सदरच्या फरार आरोपीची तपास पथकातील कर्मचारी पो.हवा. ३८६८ औचरे यांनी गोपनीय बातमी काढुन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्याने सापळा रचुन दिनांक ०१/०८/२०१९ रोजी कात्रज, पुणे येथुन ताब्यात घेवुन हडपसर पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नं. ३०५/२०१७ भा.द.वि. कलम ३६३, ३७०(अ),३७६ व अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ४,५ व पोस्को कलम ४,६,७,८,१० अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ३८६८ औचरे, पो.हवा. ८७४ सोनवणे, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ५८५३ गण्ेश दळवी, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते, पो.शि. ८६६५ पवार यांनी केली आहे